12 JAN 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठ दिनदर्शिकेतून अकरा कुलगुरूंचे दर्शन

## कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन : इमारत उद्घाटन व शिवाजी महाराज पुतळा अनावरणाचे छायाचित्र

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने यंदा आपल्या पूर्वसुरींचे स्मरण करणारी दिनदर्शिका व दैनंदिनी तयार केली आहे. या दिनदर्शिकिच्या माध्यमातून वर्षभर त्यांच्या स्मृती जागत्या राहतील, असे मत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त शिवाजी विद्यापीठ २०१८ दिनदर्शिका व दैनंदिनीच्या प्रकाशन सोहळ्यात व्यक्त केले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, दिनदर्शिकिच्या माध्यमातून विद्यापीठास लाभलेल्या सर्व माजी कुलगुरूंचे स्मरण करण्याचा व त्यांच्या स्मृती कायमस्वरुपी जतन करण्याचा प्रयत्न विद्यापीठ करीत आहे. दिदर्शिकिच्या माध्यमातून दररोज त्यांचे दर्शन घडेल. यातून शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळत राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या २०१८ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, अजित चौगुले, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. अंजली पाटील, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. जे. एस. बागी.**

शिवाजी विद्यापीठाला गेल्या ५५ वर्षांत डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासून ते डॉ. देवानंद शिंदे यांच्यापर्यंत एकूण बारा कुलगुरू लाभले. त्यामुळे या बारा कुलगुरूंची पोर्ट्रेट २०१८च्या दिनदर्शिकेमध्ये वापरण्यात आली आहेत. दैनंदिनीमध्येही दर महिन्याला एक या प्रमाणे ही पोर्ट्रेट वापरण्यात आली आहेत. दैनंदिनीच्या मुखपृष्ठावर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटनाच्या दिवशीचे (दि. २३ एप्रिल १९७१) छायाचित्र तर मलपृष्ठावर विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले, त्या दिवशीचे (दि. १ डिसेंबर १९७४) छायाचित्र वापरण्यात आले आहे.

जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, महाराष्ट्र शासनाच्या प्रि-आयएएस ट्रेनिंग सेंटरच्या संचालक डॉ. अंजली पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे.एस. बागी, वृत्तपत्रविद्या अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, संगणक विभागाच्या संचालक डॉ. स्वाती खराडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2018
लोकमत



शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, एम. एस. वासवाणी उपस्थित होते.

# वि. स. खांडेकर यांचे साहित्य प्रेरणास्थान : डी. टी. शिर्के

## शिवाजी विद्यापीठात जयंती : संग्रहालयाच्या चित्रफितीचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या प्रतिभेमुळे मराठी भाषेचा गंध सर्वदूर दरवळला. त्यांचे साहित्य आजही उदयोन्मुख साहित्यिकांसाठी प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी येथे केले.

वि. स. खांडेकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर स्मृतिसंग्रहालयातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. शिर्के म्हणाले, खांडेकर यांच्या रूपाने मराठी भाषेला महान साहित्यिक लाभला. ज्ञानपीठ पुरस्कार लाभला. खांडेकर स्मृतिसंग्रहालयाच्या माध्यमातून त्यांच्या स्मृती पुढील पिढ्यांना कायमस्वरुपी प्रेरणा देत राहतील. या कार्यक्रमात 'वि. स. खांडेकर स्मृतिसंग्रहालय : एक दृष्टीक्षेप' या चित्रफितीचे प्रकाशन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. संग्रहालयातर्फे आयोजित निबंध स्पर्धेच्या पारितोषिक विजेत्यांनाही त्यांच्या हस्ते गौरविले. या कार्यक्रमास डॉ. रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, तृप्ती करिकट्टी, एम. एस. वासवाणी, सुप्रिया खबाले, अभिजित सोकांडे, अमृता कुलकर्णी-लुकतुके, राजश्री गिरी, सोनेश्वर सोलापुरे, धैर्यशील राजेभोसले, दिग्विजय राजेभोसले आदी उपस्थित होते. संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप यांनी स्वागत केले. उदयसिंह राजेयादव यांनी आभार मानले.

खांडेकर स्मृतिसंग्रहालयाविषयी माहितीपटाची संकल्पना व निर्मिती राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीची असून लेखन व दिग्दर्शन अभिजित सोकांडे यांनी केले आहे. अमृता कुलकर्णी यांनी निवेदन केले आहे. कृष्णात कांबळे यांनी कॅमेरामन म्हणून तर सूरज कांबळे यांनी संकलन केले आहे. यात स्मृती संग्रहालयाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला आहे.

### निबंध स्पर्धेतील विजेते

मोठा गट : अनुष्का सयाजीराव राजेभोसले (जय जोतिर्लिंग माध्यमिक विद्यालय, कोलोली), श्रृती संजय शेटे (वि. स. खांडेकर प्रशाला, कोल्हापूर), पल्लवी रामचंद्र सुतार (जय जोतिर्लिंग माध्यमिक विद्यालय, कोलोली). लहान गट : संध्या राजाराम सांगवे, श्रेया जयराम राऊत, कोमल अशोक सबरद (सर्व वि. स. खांडेकर प्रशाला, कोल्हापूर).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2018
सकाळ

# वि. स. यांच्या प्रतिभेमुळेच मराठी भाषेचा गंध सर्वदूर

## डॉ. शिर्के : जयंतीनिमित्त स्मृती संग्रहालयात कार्यक्रम

कोल्हापूर, ता. ११ : 'ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या प्रतिभेमुळे मराठी भाषेचा गंध सर्वदूर दरवळला,' असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

वि. स. खांडेकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. शिर्के म्हणाले, "खांडेकर यांच्या रूपाने मराठी भाषेला महान साहित्यिक लाभला. ज्ञानपीठ पुरस्कार लाभला. त्यांचे साहित्य आजही कित्येक उदयोन्मुख साहित्यिकांसाठी प्रेरणास्थान आहे. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या माध्यमातून त्यांच्या स्मृती पुढील पिढ्यांना कायमस्वरूपी प्रेरणा देत राहतील, अशीच विद्यापीठाची त्यामागील भूमिका आहे."

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते या वेळी स्मृती संग्रहालयाविषयी तयार केलेल्या 'वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय : एक दृष्टिक्षेप' या चित्रफितीचे प्रकाशन केले. तसेच संग्रहालयातर्फे झालेल्या निबंध स्पर्धेच्या पारितोषिक विजेत्यांनाही त्यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र व ग्रंथ भेट देऊन गौरविले. संचालक डॉ. नीलांबरी जगताप यांनी प्रास्ताविक केले. उदयसिंह राजेयादव यांनी आभार मानले. डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. तृप्ती करिकट्टी, डॉ. एम. एस. वासवाणी, सुप्रिया खबाले, अभिजित सोकांडे, अमृता कुलकर्णी-लुकतुके, राजश्री गिरी, सोनेश्वर सोलापुरे, धैर्यशील राजेभोसले, दिग्विजय राजेभोसले उपस्थित होते.

**शालेय स्तरावरील निबंध स्पर्धेतील विजेते अनुक्रमे असे :**

**मोठा गट :** अनुष्का सयाजीराव राजेभोसले (जय जोतिर्लिंग माध्यमिक विद्यालय, कोलोली), श्रुती संजय शेटे (वि. स. खांडेकर प्रशाला, कोल्हापूर), पल्लवी रामचंद्र सुतार (जय जोतिर्लिंग माध्यमिक विद्यालय, कोलोली).

**लहान गट :** संध्या राजाराम सांगवे, श्रेया जयराम राऊत, कोमल अशोक सबरद (सर्व वि. स. खांडेकर प्रशाला, कोल्हापूर)

### माहितीपटाविषयी

**खांडेकर स्मृती संग्रहालयाविषयी माहितीपटाची संकल्पना व निर्मिती राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीची असून, लेखन व दिग्दर्शन अभिजित सोकांडे यांनी केले आहे. अमृता कुलकर्णी यांनी निवेदन केले असून, कृष्णात कांबळे यांनी कॅमेरामन म्हणून तर सूरज कांबळे यांनी संकलन केले आहे. पंधरा मिनिटांच्या या माहितीपटात स्मृती संग्रहालयाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला आहे.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2018
पुढारी

# विद्यापीठात ई-कंटेंट - डेव्हलपमेंट अँड होस्टिंग कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठामध्ये ई-कंटेंट डेव्हलपमेंट अँड होस्टिंग या विषयावर कार्यशाळा झाली. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय (ज्ञानस्रोत केंद्र) व आय.क्यू.ए.सी. विभागाच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यासक किशोर इंगळे, डॉ. श्वेता एस. मेथा यांनी वरील विषयावर सादरीकरण करून उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमासाठी विविध अधिविभागांतील शिक्षक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी ग्रंथालयातील डॉ. पी.बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, एस. आर. बिर्जे, आर. डी. खामकर यांनी परिश्रम घेतले. स्वागत डॉ. आर. के. कामत यांनी केले. सूत्रसंचालन कु. अलमास पेंढारी यांनी केले. डॉ. डी. बी सुतार यांनी आभार मानले.

12 JAN 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय व आयक्यूएसी विभागाद्वारे 'ई-कंटेंट डेव्हलपमेंट अँड होस्टिंग' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी नॅक, इनफ्लिबनेट, एमएचआरडी, एमओओसी, स्वयं उपक्रमांबाबत माहिती दिली. डॉ. नमिता खोत यांनी एमएचआरडी, एमओओसी, स्वयं या उपक्रमाविषयीचे शासनाचे अध्यादेश, परिपत्रके याविषयी मार्गदर्शन केले. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे किशोर इंगळे यांनी ई-कंटेंट डेव्हलपमेंट विथ प्रॅक्टिकल व चिंतामणराव इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्चचे डॉ. श्वेता एस. मेथा यांनी ई-कंटेंट होस्टिंगवर शंका निरसन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2018

Times of India

# University declares FY engg results in 34 days

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has declared results for the first year engineering courses. The results of the second, third and final years will be out by this weekend, officials said. Mahesh Kakade, director of the board of examinations and evaluation, said the first year results have been declared in 34 days.

Kakade said around 84,000 students had appeared for the exams from 36 colleges and over 3,000 evaluators have assessed over four lakh answer sheets.

For first year courses, students from only 22 college were there, as 14 colleges have affiliated themselves with Dr Babasaheb Ambedkar Technological University, he said.

"Decentralization of the assessment process worked in our favour. We have set up assessment centres in Sangli, Satara and Kolhapur districts, which has saved a lot of time for the teachers," he added.

Along with engineering, results of other subjects have also been drawn. Out of 564 examinations, results were declared for 400 so far. .Kakade said the practices of work profiling, internal mark evaluation and data feeding, and secured remote paper delivery were continued this year as well.

The varsity which usually finishes exams in 45 days had taken 52 days to conduct the exams due to Diwali holidays and governing body elections earlier last year.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2018
पुण्यनगरी

# समस्या निर्माण होताच चिंतन होणे अवश्य : डॉ. प्रल्हाद माने

गारगोटी : प्रतिनिधी :

प्रतिनिधी सोशल मीडिया हा सामाजिक परिवर्तनास जबाबदार घटक ठरत आहे. यातून सकारात्मक बदल घडून आले पाहिजे. सोशल मीडियातून सर्व क्षेत्रात सकारात्मक व नकारात्मक परिणाम होत आहेत. यातून काही समस्या निर्माण होत यावर चिंतन झाले पाहिजे, असे मत डॉ. प्रल्हाद माने यांनी व्यक्त केले.

येथील मौनी विद्यापीठाच्य कर्मवीर हिरे महाविद्यालयात 'सोशल मीडिया आणि सामाजिक परिवर्तन' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत डॉ. माने प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे होते. समाजशास्त्र विभाग व समाजकार्य विभागाने कार्यशाळेचे आयोजन केले होते.

डॉ. यू. एस. आनंद यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डी. के. पाटील यांनी स्वागत केले. उपप्राचार्य ए. जे. गोडसे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अरविंद चौगले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

प्रा. एस. बी. देसाई यांनी आभार मानले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2018
सकाळ

# अजित पाटील यांची 'सिनेट'वर नियुक्ती

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठ अधिसभा तसेच अधिकारी मंडळावर (सिनेट) अजित पाटील यांची नियुक्त झाली. पाटील हे लक्ष्मी उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. पूर्वी त्यांचे वडील दिवंगत माजी नगराध्यक्ष बी. बी. पाटील यांना पुणे तसेच शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटवर काम करण्याची संधी मिळाली होती.

लक्ष्मी-लाडा, तसेच 'लक्ष्मी-सोलर' या नावाने विकले जाणारे पंप ही सोलर उत्पादने घराघरात पोचली आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रेरणेने जयकुमार पाटील यांच्या आशीर्वादाने कुटुंबातील



सदस्य, कंपनीतील अधिकारी, कर्मचारी तसेच असंख्य ग्राहकांच्या जोरावर लक्ष्मी कंपनीने भरारी घेतल्याचे अजित पाटील यांनी सांगितले. गेली तीस वर्षे विक्री व विक्री पश्चात सेवेचे दुसरे नाव लक्ष्मी सेल्स अ‍ॅन्ड सर्व्हिसेस असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक पंप विक्रीवर ग्राहकास एक रोप भेट देण्याचा उपक्रम पाटील यांनी सुरू ठेवला आहे. सुमारे वीस हजारांवर झाडे त्यांनी जगविली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2018
सकाळ

# आंतरविभागीय सॉफ्टबॉलचे वालचंद कॉलेजला विजेतेपद



**गडहिंग्लज : आंतरविभागीय महिला सॉफ्टबॉल स्पर्धेतील विजेत्या कस्तुरबा वालचंद महाविद्यालयाला पारितोषिक देताना दीपक कुराडे. शेजारी बाबासाहेब उलपे, सुरेश धुरे, प्रकाश कांबळे आदी.**

गडहिंग्लज, ता. ११ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला सॉफ्टबॉल स्पर्धेचे सांगली कस्तुरबा वालचंद महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले. कोल्हापूरच्या कमला महाविद्यालयाने उपविजेतेपद मिळविले. कऱ्हाडच्या एसजीएम महाविद्यालयाला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाने या स्पर्धेचे संयोजन केले होते.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील नऊ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. तेहसील कवटेकर (वालचंद) हिला बेस्ट पिचर, मुस्कान गोलंदाजला (कमला) बेस्ट कॅचर, अबोली औसरेला (एसजीएम) बेस्ट बॅटर म्हणून गौरविण्यात आले. या स्पर्धेतून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ निवडला. बाबासाहेब उलपे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीत विलास डाफळे, विद्या पाटील यांचा समावेश होता. विजेत्या संघांना नगरसेवक दीपक कुराडे, श्री. उलपे, श्री. डाफळे, सौ. पाटील, ज्ञानराजा चिघळीकर, प्रकाश कांबळे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

तत्पूर्वी, पालिकेच्या महिला व बालकल्याण समिती सभापती शशिकला पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. संस्थेचे संचालक सदाशिव केसरकर यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. बाळकृष्ण चौगुले अध्यक्षस्थानी होते. प्रा. सुखदेव एकल यांनी सूत्रसंचालन केले. संयोजक सुरेश धुरे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2018
सकाळ

# प्रतापला कास्यपदक


प्रताप पाटील

कोल्हापूर, ता. ११ : रोहतक (हरियाना) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धेत प्रताप पांडुरंग पाटील याने ६३ किलो गटात कास्यपदक पटकाविले. तो शहाजी छत्रपती महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजय बोंद्रे, प्रभारी प्राचार्य प्रा. एकनाथ काटकर, प्रा. प्रशांत पाटील, रवींद्र भोसले, मनीष भोसले यांचे मार्गदर्शन मिळाले.